
समर्थन

देणगी मूल्य १५ रुपये

# विधिमंडळ कामकाजाचे (अपुरे) दिवस

## विश्लेषण




**विद्यमान विधिमंडळ सदस्य याचा गांभिर्याने विचार करणार का?**

# प्रस्तावना

विधिमंडळ म्हणजे राज्याचे सर्वोच्च सभागृह. शासनावर, प्रशासनावर अंकुश ठेवण्याचे, शासनाच्या धोरणांना दिशा देण्याचे, राज्यातील सामान्यांच्या आशा-आकांक्षा राज्याच्या धोरणात प्रतिबिंबित व्हाव्यात यासाठी आग्रही राहण्याचे महत्त्वपूर्ण कार्य विधिमंडळाने पार पाडावयाचे असते. विधिमंडळ आपले कार्य प्रामुख्याने अधिवेशनांच्या माध्यमातून पार पाडत असते. या अधिवेशनांचा कार्यकाळ किती असावा यासंदर्भात अनेक वेळा चर्चा झाल्या. अगदी अलीकडे २००१ साली पिठासीन अधिकाऱ्यांच्या एका समितीने महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात अधिवेशनांचे वर्षभरातील कामकाज किमान १०० दिवस चालावे असा ठराव केला होता.

या सर्व पार्श्वभूमीवर गेल्या वर्षी २००५ मध्ये वर्षभरातील तीनही अधिवेशने मिळून ४४ दिवसच कामकाज झाले होते हे लक्षात घेतले पाहिजे. १९९७ ते २००१ आणि २००१ ते २००५ या काळातील अधिवेशनांचे सरासरी कामकाज पाहिले तर ते अनुक्रमे ४४ दिवस व ३९ दिवस झालेले दिसते. कामकाजांच्या दिवसांचा हा उतरता कल गंभीर आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र विधिमंडळाचा नेहमीच गौरवपूर्ण उल्लेख केला जातो. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्याने अधिवेशनांचे कामकाज जास्तीत जास्त चालावे यासाठीही चांगला पायंडा पाडण्यास हरकत नसावी.

अर्थसंकल्पास मंजूरी देणे व त्याद्वारे शासनाला आर्थिक बाबींसाठी जबाबदार धरण्याचे महत्त्वाचे काम विधिमंडळ करीत असते. विभागवार अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा करण्यासाठी विधानसभेने किमान १८ दिवस देणे अपेक्षित आहे. गेल्या ५ वर्षात मात्र सरासरी ६ दिवसही विभागाच्या अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा झाली नाही. दरदिवशी चार एक तास चर्चा करून ६ दिवसात ६० हजार कोटींचा अर्थसंकल्प मंजूर केला जातो.

अधिवेशनांचा कार्यकाळ एकीकडे कमी होत असताना आमदारांचाही कामकाजातील सहभाग कमी होत चालल्याचे जाणवते. अकराव्या विधानसभेच्या पहिल्या तीन अधिवेशनांमध्ये सर्व मंत्री, विरोधी पक्षनेता, पिठासीन अधिकारी वगळता विधानसभेतील २५० सदस्यांपैकी २३ तर विधानपरिषदेच्या ७३ सदस्यांपैकी फक्त ३ सदस्यांनी विधिमंडळात १०० टक्के हजेरी लावली. दोन्ही सभागृहातील मिळून १५ सदस्य ५० टक्केही हजर नव्हते. जेथे विधिमंडळातील हजेरीच एवढी चिंताजनक आहे, तेथे प्रत्यक्ष चर्चेतील सहभाग बघावयाचा झाल्यास अधिक गंभीर चित्र समोर येण्याची शक्यताच अधिक आहे.

अधिवेशनांचे कामकाज अपेक्षित १०० दिवस झाले असते तर विधिमंडळात अधिकचे किती प्रश्न चर्चेला आले असते याचे 'समर्थन'ने विश्लेषण केले आहे. २००४ मधील शेवटचे अधिवेशन व २००५ मधील पहिली दोन अधिवेशने पूर्ण काळ चालली असती तर दोन्ही सभागृहे मिळून ४८७ प्रश्नांऐवजी १०६४ प्रश्नांवर, ५९६ लक्षवेधी सूचनांऐवजी १४०७ लक्षवेधी सूचनांवर चर्चा झाली असती. त्याचप्रमाणे अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून ४३ ऐवजी ९७ विषय तर, अशासकीय ठरावांच्या माध्यमातून १८ ऐवजी ४० विषय चर्चेला आले असते. पूर्णवेळ कामकाज झाले असता एवढ्या मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक हिताच्या प्रश्नांवर अधिक चर्चा होऊ शकली असती. विधिमंडळ सदस्य, सभागृह नेते, विरोधी पक्षाचे नेते, पिठासीन अधिकारी या सर्वांनी याचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

**- प्रिया खान**
सहसंचालिका

## २००५ मधील अधिवेशनांचे कामकाज

| अधिवेशन | दिवस | विधानसभा | | विधानपरिषद | |
|---|---|---|---|---|---|
| | | तास | मिनिटे | तास | मिनिटे |
| मार्च - एप्रिल २००५ | २४ | १८५ | २८ | १४८ | २५ |
| जुलै - २००५ | १० | ७४ | ५० | ६५ | ३५ |
| डिसेंबर - २००५ | १० | ७३ | ४४ | ७८ | २३ |
| एकूण | ४४ | ३३४ | ०२ | २९२ | २३ |

**वर्षभरातील अधिवेशनांचे कामकाज १०० दिवस चालणे अपेक्षित असताना २००५ मध्ये ते केवळ ४४ दिवसच चालले.**

१९९७ - २००१ या पाच वर्षांमधील कामकाज प्रतिवर्षी सरासरी ४४ दिवस झाले होते. मात्र २००१ - २००५ या पाच वर्षांमधील कामकाज प्रतिवर्षी सरासरी ३९ दिवस झाले आहे. कामकाजाच्या दिवसांमधील ही स्पष्ट उतरंड गंभीर आहे.

**डिसेंबर २००४, मार्च -एप्रिल २००५ व जुलै २००५ या ११ व्या विधानसभेच्या पहिल्या तीन अधिवेशनांमधील विधिमंडळ सदस्यांची सरासरी उपस्थिती**

- **विधानसभेच्या २५० सदस्यांपैकी फक्त २३ सदस्य व विधानपरिषदेच्या ७३ सदस्यांपैकी फक्त ३ सदस्य १०० टक्के उपस्थित होते.** *
- **विधानसभेचे ८ तर विधानपरिषदेचे ७ सन्माननीय सदस्य ५०टक्क्यांपेक्षाही कमी उपस्थित होते.**

**१०० टक्के उपस्थित राहिलेल्या २६ विधिमंडळ सदस्यांचे 'समर्थन' परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन**

* सर्व मंत्री, विरोधी पक्षनेता, पिठासीन अधिकारी यांचा समावेश नाही.

## विधानसभेत चर्चेला आलेले तारांकित प्रश्न

| अधिवेशन | एकूण स्वीकृत प्रश्न | वेळेअभावी अतारांकित झालेले प्रश्न | चर्चेला आलेले प्रश्न | दर दिवशी चर्चेला आलेले सरासरी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर - २००४ | ६१६ | ४२५ | ६० | ५.४५ |
| मार्च - एप्रिल २००५ | १०८८ | ९३८ | १४१ | ५.८७ |
| जुलै - २००५ | २०९७ | २०३८ | ५३ | ५.३ |
| एकूण | ३८०१ | ३४०१ | २५४ | ५.५४ |

## विधानपरिषदेत चर्चेला आलेले तारांकित प्रश्न

| अधिवेशन | एकूण स्वीकृत प्रश्न | वेळेअभावी अतारांकित झालेले प्रश्न | चर्चेला आलेले प्रश्न | दर दिवशी चर्चेला आलेले सरासरी प्रश्न |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर - २००४ | ४४६ | २९७ | ४३ | ३.९१ |
| मार्च - एप्रिल २००५ | १३४२ | १००३ | १३५ | ५.६२ |
| जुलै - २००५ | ३६७९ | १३४४ | ५५ | ५.५ |
| एकूण | ५४६७ | २६४४ | २३३ | ५.१ |

२००४ चे शेवटचे अधिवेशन व २००५ मधील पहिल्या दोन अधिवेशनांचे कामकाज एकूण ४५ दिवस चालले. या तीन अधिवेशनांमध्ये विधानसभेत २५४ प्रश्नांवर तर विधानपरिषदेत २३३ प्रश्नांवर चर्चा झाली.

**ही तीनही अधिवेशने मिळून दोन्ही सभागृहातील २७ प्रश्न सदस्य अनुपस्थितीमुळे अतारांकित झाले.**

**अपेक्षित १०० दिवस कामकाज झाले असते तर ...**

**विधानसभेत ५५४ प्रश्नांवर म्हणजे अधिकच्या ३०० प्रश्नांवर चर्चा झाली असती**

**विधानपरिषदेत ५१० प्रश्नांवर म्हणजे अधिकच्या २७७ प्रश्नांवर चर्चा झाली असती**

## विधानसभेत चर्चेला आलेल्या लक्षवेधी सूचना

| अधिवेशन | आलेल्या एकूण सूचना | स्वीकृत सूचना | अस्वीकृत सूचना | चर्चेला आलेल्या सूचना | दरदिवशी चर्चेला आलेल्या सरासरी सूचना |
|---|---|---|---|---|---|
| डिसेंबर - २००४ | १०८३ | ३०३ | ७८० | १२० | १०.९१ |
| मार्च - एप्रिल २००५ | २३१० | ६२२ | १६८८ | १९८ | ८.२५ |
| जुलै - २००५ | १८३८ | ४३० | १४०८ | १२८ | १२.८ |
| एकूण | ५२३१ | १३५५ | ३८७६ | ४४६ | १०.६५ |

## विधानपरिषदेत चर्चेला आलेल्या लक्षवेधी सूचना

| अधिवेशन | आलेल्या एकूण सूचना | स्वीकृत सूचना | अस्वीकृत सूचना | चर्चेला आलेल्या सूचना | दरदिवशी चर्चेला आलेल्या सरासरी सूचना |
|---|---|---|---|---|---|
| डिसेंबर - २००४ | ७२० | १४० | ५८० | ३४ | ३.०९ |
| मार्च - एप्रिल २००५ | १२७९ | ३३८ | ९४१ | ७६ | ३.१७ |
| जुलै - २००५ | ११११ | २५२ | ८६७ | ४० | ४ |
| एकूण | ३११८ | ७३० | २३८८ | १५० | ३.४२ |

निकडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'लक्षवेधी सूचना' या आयुधाचा वापर केला जातो.

११व्या विधानसभेच्या पहिल्या ३ अधिवेशनांचे कामकाज ४५ दिवस झाले. या अधिवेशनांमध्ये विधानसभेत ४४६ लक्षवेधी सूचनांवर तर विधान परिषदेत १५० लक्षवेधी सूचनांवर चर्चा झाली.

**अपेक्षित १०० दिवस कामकाज झाले असते तर ...**

**विधानसभेत १०६५ लक्षवेधी सूचनांवर म्हणजेच अधिकच्या ६१९ सूचनांवर चर्चा झाली असती.**

**विधानपरिषदेत ३४२ लक्षवेधी सूचनांवर म्हणजेच अधिकच्या १९२ सूचनांवर चर्चा झाली असती.**

## विधानसभा - अर्धा तास चर्चा

| अधिवेशन | एकूण आलेल्या सूचना | स्वीकृत झालेल्या सूचना | चर्चेला आलेल्या सूचना | सदस्य अनुपस्थितीमुळे चर्चेला न आलेल्या सूचना |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर - २००४ | १४४ | ११६ | ०८ | -- |
| मार्च - एप्रिल २००५ | ३७६ | २०३ | १८ | ०१ |
| जुलै - २००५ | ३१९ | १६६ | ०२ | -- |
| एकूण | ८३९ | ४८५ | २८ | ०१ |

## विधानपरिषद - अर्धा तास चर्चा

| अधिवेशन | एकूण आलेल्या सूचना | स्वीकृत झालेल्या सूचना | चर्चेला आलेल्या सूचना | सदस्य अनुपस्थितीमुळे चर्चेला न आलेल्या सूचना |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर - २००४ | ३० | २७ | ०२ | ०१ |
| मार्च - एप्रिल २००५ | ६६ | ५३ | १० | ०२ |
| जुलै - २००५ | ४४ | ३९ | ०३ | -- |
| एकूण | १४० | ११९ | १५ | ०३ |

सिमित व्याप्तीचे व राज्यशासनाची जबाबदारी असलेले विषय सभागृहात उपस्थित करण्यासाठी सदस्यांना या आयुधाचा उपयोग होतो.

प्रश्नोत्तरांतून उद्‌भवलेल्या व त्या व्यतिरिक्तच्या अर्धा तास सूचना एकत्रितपणे पाहिल्यास ३ अधिवेशने मिळून विधानसभेत २८ सूचनांवर चर्चा झाली तर विधान परिषदेत १५ सूचनांवर चर्चा झाली.

**अपेक्षित १०० दिवस कामकाज झाले असते तर ...**

**विधानसभेत ६३ सूचनांवर तर विधानपरिषदेत ३४ सूचनांवर म्हणजेच अधिकच्या ५४ सूचनांवर चर्चा झाली असती.**

## अशासकीय ठराव

| अधिवेशन | आलेल्या एकूण सूचना | | स्वीकृत सूचना | | अमान्य सूचना | | चर्चा झालेल्या सूचना | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सभा | परिषद | सभा | परिषद | सभा | परिषद | सभा | परिषद |
| डिसेंबर - २००४ | १८३ | ९१ | १५३ | ७५ | ३० | १६ | ०१ | ०२ |
| मार्च - एप्रिल २००५ | ३१९ | ११२ | २४२ | ७२ | ७७ | ४० | ०३ | ०६ |
| जुलै - २००५ | २९० | ९४ | २५५ | ७१ | ३५ | २३ | ०३ | ०३ |
| एकूण | ७९२ | २९७ | ६५० | २१८ | १४२ | ७९ | ०७ | ११ |

सार्वजनिक हिताच्या बाबीवर सभागृहात चर्चा उपस्थित करण्यासाठी, शासनाच्या एखाद्या कृतीविषयी, ध्येय-धोरणाविषयी मत व्यक्त करण्यासाठी सदस्यांना या आयुधाचा उपयोग होतो.

४५ दिवसांच्या कामकाजात विधानसभेत ७ तर विधान परिषदेत ११ अशासकीय ठराव चर्चेला आले.

**अपेक्षित १०० दिवस कामकाज झाले असते तर ...**

**विधानसभेत अधिकचे ८ अशासकीय ठराव तर**
**विधानपरिषदेत अधिकचे १४ अशासकीय ठराव चर्चेला आले असते.**

*ज्या ठिकाणी जनतेची दु:खं, जनतेची सुखं,*
*जनतेच्या आशा, जनतेच्या आकांक्षा, जनतेची स्वप्नं*
*ही सरकारची स्वप्नं असतात, जनतेची दु:ख ही*
*सरकारची दु:ख होतात, जनतेला ठेच लागते*
*आणि या सरकारच्या डोळ्यात पाणी येतं,*
*जनता रक्तबंबाळ होते, सरकार विव्हळू लागते,*
*ती खरी लोकशाही.*

*- बॅ. नाथ पै*

## डिसेंबर २००४, मार्च-एप्रिल व जुलै २००५ या ३ अधिवेशनांमध्ये १०० टक्के उपस्थित मान. सदस्य

### विधानपरिषद

● श्री. रामनाथ मोते ● श्री. अरविंद सावंत ● श्री. नितीन गडकरी

### विधानसभा

● श्री.नरसैया आडाम ● श्री.संपतराव अवघडे ● श्री. संजय चव्हाण
● श्री. चंद्रकांत छाजेड ● श्री. वामनराव चटप ● श्री. शिवराम दळवी
● श्री. शंभुराज देसाई ● श्री. शरद ढमाले ● श्रीम. वर्षा गायकवाड
● श्री. सुरेश गंभीर ● श्री. कृष्णा घोडा ● श्री. पी.यू.मेहता
● श्री. सुधीर मुनगंटीवार ● श्री. अरविंद नेरकर ● श्रीम. मनिषा निमकर
● श्री. पी.एन.पाटील ● श्री. दगडू सकपाळ ● श्री. रामचंद्र साळे
● श्री. जगन्नाथ शेट्टी ● श्री. अनंतराव थोपटे ● श्री. राजू तिमांडे
● श्री. पद्माकर वळवी ● श्री. दिलीप येळगावकर

***१०० टक्के उपस्थित सदस्यांमध्ये शिवसेनेचे ८, काँग्रेसचे ७, राष्ट्रवादी काँग्रेसचे ४, भाजपचे ३ तर अपक्ष व इतर पक्षांचे ४ सदस्य आहेत.***

*स्रोत : डिसेंबर २००४, मार्च - एप्रिल २००५ व जुलै २००५ मधील अधिवेशनांबाबतची माहिती संक्षिप्त अहवालांतून तर डिसेंबर २००५ मधील अधिवेशनाबाबतची माहिती कार्यवृत्तांतामधून.*

*तुम्ही ग्रामस्थ, तुम्ही गावकरी मंडळी, तुमच्या पर्यंत सत्य पोहचत असले पाहिजे. परंतु अनेक गावकरी वर्तमानपत्र विकत घेऊ शकत नाही. काही बिचारे वाचूही शकत नाहीत. त्यांना हे सारे कळत नाही आणि त्यांच्या मनात हा प्रश्न येतो की, ज्यांना आम्ही एवढ्या प्रेमाने लाखमोलाचे आमचे मत देऊन निवडून दिले ते आमचे नेते आमच्या करता करतात काय ? आमच्या करता झगडतात का ? आणि हा तुमचा प्रश्न योग्य आहे, रास्त आहे. तुम्ही आम्हाला असेच विचारले पाहिजे. आमचे पुढारी काय करत आहेत असा प्रश्न जोपर्यंत तुमच्या मनामध्ये येत राहील, तोपर्यंत आमची लोकशाही जिवंत राहणार आहे.*

*- बॅ. नाथ पै*

संकलन, संपादन, निर्मिती आणि प्रकाशन : 'समर्थन' - द्वारा विधायक संसद, ८७/३, मुंबादेवी म्युनिसिपल शाळा, काळबादेवी रोड, मुंबई - ४०० ००२.
दूरध्वनी: २२४२ ५२९२ ● टेलिफॅक्स: २२४२ ८२९१ ● Email: samarthanmumbai@vsnl.net
मुद्रक : चिंतनाक्षर ग्राफिक्स, १६, श्री हनुमान इंडस्ट्रिअल इस्टेट, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई - ४०० ०३१